# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:04.06.2026** **वार:गुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्रपती डेलसी रॉड्रिगेज यांच्यात आज नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा
2. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा आज शिलॉन्ग इथ ईशान्य भारतातील राज्यांच्या 73 व्या परिषदेला उपस्थित राहणार
3. भारत आणि अमेरिका दरम्यानच्या व्यापार करारावर दीर्घकाळ चालू असलेली चर्चा अंतिम टप्प्यात आणि
4. सेफ महिला अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेत, यजमान भारतीय संघाचा अंतिम फेरीत प्रवेश

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्रपती डेलसी रॉड्रिगेज यांच्या बरोबर द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये ऊर्जासुरक्षा, व्यापार, गुंतवणूक, आरोग्य सेवा औषध उद्योग, नवीकरणीय ऊर्जा आदि विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्रपती डेलसी रॉड्रिगेज या 5 दिवसांच्या भारत दौऱ्यावर आल्या असून, भारत आणि व्हेनेझुएला दरम्यान चे संबंध अधिक मजबूत होण्यासाठी, त्यांचा हा दौरा महत्वपूर्ण मानला जात आहे .

**ब्रीक्स**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संसदीय मतदारसंघ असलेल्या वाराणसी शहरात आज आणि उद्या ब्रीक्स सांस्कृतिक कार्यगटाच्या दुसऱ्या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. यजमानपद चीन, ब्राझील, इजिप्त, इथिओपिया आणि इंडोनेशियासह 11 देशांचे प्रतिनिधी या बैठकीत सहभागी होतील. या बैठकीत वरिष्ठ मुत्सद्दी, धोरणकर्ते आणि सांस्कृतिक क्षेत्रातील तज्ज्ञ चर्चा करतील. तसंच या बैठकीदरम्यान, काशीची जगप्रसिद्ध 'जी आय-टॅग' प्राप्त उत्पादनांच एक विशेष प्रदर्शनही आयोजित करण्यात आलं आहे. या प्रदर्शनात, वाराणसीच्या समृद्ध हस्तकला परंपरेचं प्रदर्शन कारागीर करतील.

**अमित शहा**

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा आज मेघालय मधील शिलॉन्ग इथ ईशान्य भारतातील राज्यांच्या 73 व्या परिषदेला उपस्थित राहणार असून त्याच अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. या परिषदेत पूर्वोत्तर राज्यातील विविध विकास संबंधी मुद्द्यांवर व्यापक चर्चा करण्यात येणार आहे. यामध्ये पायाभूत सुविधांचा विकास, शेती, बागा, क्रीडा, पर्यटन, गुंतवणूक, संपर्क साधनांचा विकास, हस्तशिल्प आदि विविध क्षेत्रांचा समावेश आहे. या परिषदेत ईशान्य भारत विकास व्हीजन 2047 याबाबत ही व्यापक चर्चा होणार आहे. या परिषदेत पूर्वोत्तर राज्य विकासमंत्री ज्योतिरादित्य सिंदिया, राज्यमंत्री सुकांत मुजुमदार,ईशान्य भारतातील 8 राज्यांचे राज्यपाल, मुख्यमंत्री तसच केंद्र आणि राज्यं सरकारांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार आहेत .

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज संध्याकाळी दोन दिवसांच्या त्रिपुरा दौऱ्यावर जात आहेत. या दरम्यान ते लंकामुरा इथल्या सीमा सुरक्षा दलाच्या चौकीच उद्घाटन करणार असून पुष्पदंत पॅलेस हॉटेलचा शिलान्यास ही करणार आहेत. तसच अमित शहा राज्यं आणि केंद्रीय सुरक्षा दलातील अधिकाऱ्यांबरोबर उच्चस्तरीय बैठक करणार आहेत.

**<u>केंद्रीय मंत्री मंडळ निर्णय</u>**

विमान कंपन्यांना इंधन दरवाढीपासून दिलासा देण्यासाठी दहा हजार कोटींच्या स्थिरीकरण निधीला काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत बैठकीनंतर पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री मंडळाच्या विविध निर्णयांबद्दल माहिती दिली.

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर विमान इंधनाचे दर मे महिन्यात अडीच पटीने वाढले आहेत.
विमान कंपन्याना देण्यात येणारा 10 हजार कोटींचा हा फिरता निधी असून यामुळे इंधनाचे  दर स्थिर ठेवायला मदत होईल, विमान वाहतूक परिसंस्थेवर अवलंबून 77 लाख नोकऱ्यांना यामुळे संरक्षण मिळेल, असही वैष्णव याआणि सांगितल

याशिवाय नवी दिल्लीतल्या जुन्या बस आणि ट्रक बदलण्यासाठी राष्ट्रीय राजधानी क्षेत्र नियोजन मंडळाला सहाय्य करण्यासाठीच्या योजनेलाही कालच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. याची अंमलबजावणी दिल्ली, हरियाणा, उत्तरप्रदेश आणि राजस्थान या राज्यांच्या सहकार्याने केली जाईल. दिल्ली राजधानी क्षेत्रातलं प्रदूषण कमी करणं हे याचं उद्दिष्ट असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.
रामेश्वर ते पारादीप या 163 किलोमीटरच्या सागरी किनारी  मार्गालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. याला आठ हजार तीनशे कोटी खर्च येईल असं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>रुबियो</u>**

भारत आणि अमेरिका दरम्यानच्या व्यापार करारावर दीर्घकाळ चालू असलेली चर्चा अंतिम टप्प्यात असून लवकरच या कराराला अंतिम स्वरूप दिल जाईल आणि येत्या काही आठवड्यात तो पूर्ण होईल असा विश्वास अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी व्यक्त केला आहे. अमेरिकेच्या परदेशी व्यवहार विषयक समितीच्या बैठकीत ते काल बोलत होते. हिंद प्रशांत महासागर क्षेत्रात भारत हा अमेरिकेचा महत्वपूर्ण धोरणात्मक भागीदार असल्याच त्यांनी सांगितल. नुकत्याच झालेल्या भारत दौऱ्यात आपण भारतासोबतच क्वाड् देशांच्या गटातील ऑस्ट्रेलिया, जपान यांच्या बरोबर ही सागरी व्यापार वाढवण्या संदर्भात चर्चा केली असल्याच मार्को रुबियो यांनी सांगितल

**<u>योगोत्सव</u>**

जगभरात योगासनांना प्रचंड लोकप्रियता मिळत असून आज गुजरातमधल्या अहमदाबाद इथं 'पहिली जागतिक योगासन क्रीडा स्पर्धा 2026' होत आहे,अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासंदर्भात प्रसिद्ध केलेल्या समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे. ते या कार्यक्रमात आज आभासी माध्यमातून सहभागी होतील. या स्पर्धा योगासनांच्या जागतिक क्रीडा वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहेत असं सांगत स्पर्धेचं आयोजन करणाऱ्यांना आणि स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना पंतप्रधानांनी शुभेच्छा दिल्या आहेत. या जागतिक योगासन स्पर्धा 8 जून पर्यंत चालणार आहेत.

**<u>रेल्वे मंत्री-पश्चिम बंगाल</u>**

पश्चिम बंगालमधल्या विविध प्रलंबित रेल्वे प्रकल्पांच्या कामाला गती देण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव येत्या शनिवारी कोलकाता इथं भेट देणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते राज्याचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्यासोबत

एका उच्चस्तरीय बैठकीत सहभागी होतील. या बैठकीला रेल्वे विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि मेट्रो रेल्वेचे महाव्यवस्थापक देखील उपस्थित राहतील.

या बैठकीत चर्चेचा मुख्य भर राज्यातल्या विविध रेल्वे प्रकल्पांवर असणार असून यामुळं रेल्वे विकासाच्या संदर्भात केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध अधिक दृढ होण्याची अपेक्षा आहे.

**आग**

नवी दिल्लीतल्या मालविय नगर इथ काल एका हॉटेल ला लागलेल्या आगीच्या दुर्घटनेतील मृतांची संख्या आता 21 झाली आहे. यामध्ये 12 परदेशी नागरिक तर 9 भारतीयांचा समावेश असल्याची माहिती दिल्ली पोलिसांनी दिली आहे. आतापर्यंत 49 जखमीना रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आल होत त्यातील 21 जणांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. 8 जणांना उपचारानंतर घरी सोडण्यात आल. पोलिसांनी या संदर्भात तपास सुरू केला असून इमारतीचा मालक लवकेश बजाज याला पोलिसांनी ताब्यात घेतळ आहे.

**पुरस्कार**

बालस्नेही पंचायत' आणि 'जलसमृद्ध पंचायत' या दोन प्रमुख श्रेणींसह अन्य विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यातील ग्रामपंचायतींना काल राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आलं.

केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाच्या वतीनं आयोजित 'राष्ट्रीय पंचायत पुरस्कार 2025' मध्ये केंद्रीय पंचायत राज मंत्री राजीव रंजन सिंह ऊर्फ ललन सिंह, यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते या पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं.

भंडारा जिल्ह्यातील इटगाव पुनर्वसन ग्रामपंचायतीनं 'बालस्नेही पंचायत' श्रेणीत देशात प्रथम क्रमांक मिळवत 1 कोटी रुपयांचं पारितोषिक पटकावलं.

तर रायगड जिल्ह्यातील खारीवली ग्रामपंचायतीनं 'जलसमृद्ध पंचायत' श्रेणीत देशात प्रथम क्रमांक मिळवत 1 कोटी रुपयांचा पुरस्कार प्राप्त केला.

**फुटबॉल**

गोव्यातल्या मडगाव इथं सुरू असलेल्या सेफ महिला अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेत, काल यजमान भारतीय संघाने उपांत्य फेरीत भूतानचा एक शून्यनं पराभव करत, स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे. सामन्याच्या 58 व्या मिनिटाला संफिदा नोंगक्रमने निर्णायक गोल करत, जागतिक क्रमवारीत 69व्या स्थानी असलेल्या भारताला सहा वर्षांनंतर पहिल्यांदाच महिला अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचवलं. या स्पर्धेत पाच वेळा विजेतेपद पटकावलेला भारत आता येत्या शनिवारी विजेतेपदाच्या लढतीत, गतविजेत्या बांगलादेशच्या संघाबरोबर अंतिम सामना खेळणार आहे .

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार